


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com





वर्ष ३ रे अंक : २८५ वा मंगळवार दि. १४ जानेवारी २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी टेकाळेंवर एसीबीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची एव्हढी मेहेरनजर कशासाठी?

## अवैध संपत्तीचे पुरावे देऊनही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग अद्यापही ढिम्मच

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याच्या महसूल विभागातील भ्रष्टाचाराचे शिरोमणी आणि अत्यंत बेशरम होऊन भ्रष्टाचार करणारे बहुचर्चित मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांच्या शेकडो कोटी रुपयांच्या अवैध संपत्तीची पुराव्यांनिशी सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे देण्यात आलेली आहे. मात्र, अनेक महिने उलटूनही एसीबीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकरणी फारशी काही कारवाई केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे महाभ्रष्टाचारी टेकाळे यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून एव्हढी मेहेरनजर कशासाठी दाखवली जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने आता एसीबीच्या अधिकाऱ्यांना कारवाईसाठी पुन्हा एकदा स्मरमणपत्र देण्यात आलेले आहे.महसूल विभागात वर्षानुवर्षे काम करीत असताना मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे नामक महानालायक अधिकाऱ्याने महसूल विभागाला भ्रष्टाचाराची गटारगंगा करून टाकले आहे. पदोपदी भ्रष्टाचार करणाऱ्या टेकाळे यांच्या भ्रष्टाचाराविषयी लिहायचे झाले, तर एखादे पुस्तक देखील कमी पडू शकेल. महसूल विभागात अत्यंत बेबंदपणे भ्रष्टाचार करणारे विजय टेकाळे हे राज्याच्या महसूल विभागात अत्यंत दुर्मिळ व्यक्ती आहेत. एकीकडे भ्रष्टाचार करायचा, त्यातून जनसामान्यांची लुबाडणूक करायची, भ्रष्टाचाराच्या पैशातून प्रचंड अशी अपसंपदा गोळा करायची, स्वतःच्या नावे, पत्नीच्या नावे व जवळच्या नातेवाईकांच्या नावे शेकडो सातबारे करून घ्यायचे, वरिष्ठ अधिकाऱ्यांना ब्लॅकमेल करायचे, अधिकाऱ्यांना आपल्या भ्रष्टाचारात सामिल करून घ्यायचे आणि त्यानंतर राजकीय पातळीवर लोकप्रतिनिधींशी संधान साधून स्वतःची कातडी वाचवून घ्यायची, हे प्रकार टेकाळे यांनी केलेले आहेत. टेकाळेंवर कारवाई करण्याबाबत महसूल विभागाचे वरिष्ठ अधिकारी अत्यंत लाचार दिसून येत आहेत. ना जिल्हाधिकारी, ना अपर जिल्हाधिकारी, ना निवासी उपजिल्हाधिकारी, ना उपविभागीय अधिकारी कोणीही अधिकारी आज टेकाळेंवर कायदेशीर कारवाई करण्यास धजावत नाहीएत. यावरून टेकाळेंची दहशत अधिकाऱ्यांवर किती आहे, हे स्पष्टपणे दिसून येते. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज ने सर्वप्रथम टेकाळेंचा भ्रष्टाचार जनतेसमोर उघडा-नागडा केलेला आहे. टेकाळेंचे भ्रष्टाचाराचे साम्राज्य जनतेसमोर उघडे पाडण्याचे महत्कार्य दैनिक जनसंचलन ने केले आहे. यानंतरही अधिकारी कारवाई करीत नाहीत, म्हणून टेकाळेंच्या बेकायदेशीर अपसंपदेचे स्वतःच पुरावे गोळा करून ते पुरावे दि. ६ फेब्रुवारी २०२३ रोजी तसेच २९ एप्रिल २०२४ रोजी बुलढाणा लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांना दिले. खरे तर टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची माहिती ही एसीबीच्या अधिकाऱ्यांना नसेल, असे समजणेच अज्ञानीपणाचे आहे. परंतु सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनकडून पुरावे दिल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम केले आहे. परंतु म्हणावी तशी ठोस अशी फौजदारी कारवाई करण्यात एसीबीच्या वतीने कुचराई करण्यात येत आहे. त्यामुळे मस्तवाल झालेले उर्मट टेकाळे हे आजही बेशरमपणे उजळ माथ्याने फिरताना दिसून येत आहेत. टेकाळे हे बेशरम तर आहेतच परंतु त्यांच्यावर कारवाई न करणारे महसुलचे वरिष्ठ अधिकारी देखील गेंड्याची कातडे पांघरून बसल्याचे दिसून येत आहे. पोलीस प्रशासनात तक्रार करूनही आणि पुरावे देऊनही एसीबीचे अधिकारी कारवाई करीत नसल्यामुळे दैनिक जनसंचलनच्या वतीने पुन्हा एकदा कारवाईसाठी ७ जानेवारीला एक लेखी स्मरणपत्र लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांना देण्यात आले आहे. यामध्ये टेकाळे यांच्या बेनामी संपत्तीची खुली चौकशी करून ती अवैध संपत्ती शासन दप्तरी जमा




करण्याची मागणी करण्यात आली आहे. आता तरी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांनी जागे व्हावे आणि महसूल विभागातील ही भ्रष्टाचाराची कीड काढण्यासाठी पुढाकार घ्यावा. असे झाल्यास दिसून येईल की हे सर्वसामान्यांचे राज्य आहे. अन्यथा हे राज्य भ्रष्टाचाऱ्यांचे आणि भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी घालणाऱ्यांचे आहे, असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. काहीही असले तरी दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज मात्र याविरोधात ठामपणे लढत राहणार आहे. जोपर्यंत टेकाळेंसारख्या भ्रष्टाचारी अपप्रवृत्ती महसूल विभागातून जात नाहीत, तोपर्यंत हा संघर्ष अविरत सुरूच राहील.

अजून बरेच काही पुढील भागात...

# मलकापूरात भाजपच्या गटांत हाणामारी राजकीय संघर्षाचा व्हिडिओ चर्चेत!

## मलकापूरमध्ये भाजप नेत्यांचा सभागृहात हल्ला!

**जनसंचलन/मलकापूर**

कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती निवडणुकीत भाजपच्या दोन गटांमध्ये दोन दिवसांपूर्वी प्रचंड तणाव आणि हाणामारी झाली. मलकापूर विधानसभा मतदारसंघाचे भाजप आमदार चैनसुख संचेती यांच्या गटाचे उमेदवार संजय काजळे बिनविरोध सभापती म्हणून निवडून आल्यावर वातावरण पेटले. यानंतर, मलकापूरचे भाजप नेते शिवा तायडे यांच्या गटाने काजळे यांच्यावर सभागृहातच हल्ला चढवला. ही घटना इतकी गंभीर झाली की, सभागृहातच दोन्ही गट रस्त्यावर उतरल्यासारखे भिडले. हाणामारीच्या या प्रकाराने निवडणूक सभागृह रणांगण बनले. विशेष म्हणजे, हा सगळा प्रकार पोलिसांच्या उपस्थितीत घडला. पोलिसांना हस्तक्षेप करून दोन्ही गटांना शांत करण्यासाठी खूप प्रयत्न करावे लागले. तणाव इतका वाढला की काही क्षण सभागृहात भयग्रस्त वातावरण तयार झाले होते. या प्रकरणाचा व्हिडिओ आता सोशल मीडियावर जोरदार व्हायरल होत आहे. भाजपच्या अंतर्गत कलहामुळे पक्षाची प्रतिमा मलकापूर परिसरात गालबोट लागल्याचे बोलले जात आहे. सत्ताधाऱ्यांच्या अशा वर्तनामुळे स्थानिक शेतकऱ्यांत संताप निर्माण झाला असून, या घटनेचा सर्व स्तरांतून निषेध केला जात आहे. गटबाजीमुळे राजकारणाची पातळी घसरल्याची भावना नागरिकांमध्ये आहे.



दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# श्री शिवाजी हायस्कूलचे शिक्षक निलंबित !

**जनसंचलन/मेहकर**


तालुक्यातील जानेफळ येथील श्री शिवाजी हायस्कूल गत काही दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात अडकली आहे. विद्यालयातील शिक्षक संजय चांगाडे यांना संस्थेचे अध्यक्ष सागर देवकर यांनी निलंबित केले आहे. कर्तव्यात कसूर केल्याप्रकरणी पत्रामध्ये अनेक कारण देत, त्यांच्यावर कारवाई करण्यात येत असल्याचे आदेशात म्हटले आहे. निलंबित झालेल्या शिक्षकाच्या समर्थनात जानेफळ येथे २०० ते ३०० लोकांनी एकत्र येऊन येणाऱ्या काळात मोठ्या प्रमाणात विविध आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. निलंबित शिक्षकाने संस्था अध्यक्ष यांच्यावर गंभीर आरोप केले असून, यांच्यामुळेच - मागील आठ महिन्यांपूर्वी या विद्यालयातील मुख्याध्यापकांनी गळफास घेतल्याचे त्यांनी म्हटले आहे. या प्रकरणी संस्थाध्यक्ष सागर देवकर यांच्याशी संपर्क केला असता, या प्रकरणावर सध्या बोलणार नसल्याचे त्यांनी सांगितले.

# सुनेला आणण्यासाठी गेलेल्या महिलेला मारहाण

**जनसंचलन/मोताळा**



सुनेला आणण्यासाठी गेलेल्या महिलेस मारहाण करण्यात आल्याची घटना १२ जानेवारी रोजी गोसिंग येथे घडली या प्रकरणी बोराखेडी पोलिसांनी चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. आकाश प्रकाश चव्हाण (रा. टाकळी तलाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १२ जानेवारी रोजी माहेरी गेलेल्या पत्नीस आणण्यासाठी १२ जानेवारी रोजी गोसिंग येथे नातेवाइकांसह गेले होते यावेळी प्रभाकर सावंत यांनी त्यांची मुलगी ही सासरी पाठविण्यास नकार देत फारकत घ्यायची आहे असे म्हणत फिर्यादी आणि आई, वडिलांना अश्लील शिविगाळ केली तसेच आकाश प्रभाकर सावंत यांनी लोखंडी पाइप फिर्यादीच्या आईच्या डोक्यात मारले प्रभाकर सावंत याने काठीने मारले तर प्रतीक्षा प्रभाकर सावंत आणि सुमन प्रभाकर सावंत यांनी हातपाय तोडण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत म्हटले आहे त्यावरून पोलिसांनी उपरोक्त चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास पोहेकॉं सपडासिंग चव्हाण हे करत आहे



# सामाजिक बदलाचे पाऊल दिवंगत पतीच्या नावे यंदा देती कोणाची राणी

## विधवा महिलाही देणार तीळ संक्रांतीचे वाण!

**जनसंचलन/बुलढाणा**

सामाजिक रूढी प्रथा यांना फाटा देत मानस फाउंडेशनने बुलढाण्यातून सामाजिक बदलाचे रणसिंग फुंकले आहे. त्याचाच एक भाग म्हणून तीळ संक्रांतीला आता विधवा महिलाही वाण देणार आहेत. तीळ संक्रांतीचे वाण विधवा महिला देत नाही, मात्र प्रथमच हा उपक्रम बुलढाण्यात राबवलीला जातोय. सामाजिक बदलाचे पाऊल ठरणारा हा उपक्रम त्यामुळे चर्चेचा विषय देखील ठरला आहे. तीळ संक्रांत हा सण महत्त्वाचा सण मानला जातो. या दिवशी सवाष्ण महिला एकमेकींना वान देतात. पारंपारिक पोशाख परिधान करून देती कोणाची राणी ... असे म्हणत महिलाना वाण देण्याची प्रथा आहे.मात्र यामध्ये विधवा महिलांना सहभागी करून घेतले जात नाही. नेमकी ही बाब हेरून मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डी एस लहाने यांनी सामाजिक बदलाच्या दिशेने पुन्हा एक पाऊल टाकले आहे. शिवसाई परिवार बुलढाणा या ठिकाणी विधवा महिलांना त्यांनी वाण देण्यासाठी बोलवले आहे. तुळशी नगर मध्ये होणारा हा कार्यक्रम त्यामुळेच लक्षवेधी ठरला आहे. विधवा महिलांना सामाजिक कार्यामध्ये सहभागी करून घेतले जात नाही. त्यांना दूर ठेवण्याकडे समाजाचा कल आजवर राहिलेला आहे. त्यामुळे विधवा ह्या दुर्लक्षित घटक झालेल्या आहे. शुभ कार्यामध्ये तर त्यांना मुद्दामहून दूर ठेवल्या जाते. सणांमध्ये महत्वाचा सण असलेल्या तीळ संक्रांतीमध्ये सुद्धा सवाष्ण महिला वान देतात. परंतु विधवांना यातही दूर सारले जाते. विधवांची होणारी ही कुच्चबना पाहता मानस फाउंडेशन यासाठी पुढाकार घेतला असून विधवा महिलाही आता वाण देणार आहे. शिवसाई परिवार मुख्यालयामध्ये याबाबत मानस फाउंडेशनच्या सदस्यांची बैठक नुकतीच पार पडली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला.

### मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-- प्राध्यापक लहाने

**मानस फाउंडेशन द्वारा विधवांसाठी आयोजित या कार्यक्रमात विधवा महिलांनी सहभागी व्हावे असे अवाहन मानस फाउंडेशनचे अध्यक्ष प्राध्यापक डीएस लहाने यांनी केले आहे. सहभागी विधवा महिलांना यावेळी संक्रांतीची भेटही दिली जाणार आहे प्राध्यापक लहाने यांच्या संकल्पनेतून होणार हा कार्यक्रम समाज बदलाचे पाऊल ठरणार आहे.**

# धुके पडल्याने हरभऱ्याची फुलगळती किडींचा प्रादुर्भाव

## परिसरातील चित्र वातावरणातील बदलाचा परिणाम



**जनसंचलन/कनारखेड**

शेगाव तालुक्यात वातावरणातील बदलाचा परिणाम पिकांवर दिसून येत आहे. सध्यास्थितीत पहाटेच्या सुमारास धुक्याची चादर पसरत असून, पिकांवर रोगराई वाढली आहे. धुक्यामुळे बहरलेल्या हरभऱ्याची फुलगळती होत असून, मक्यासह इतर पिकांवर विविध किडींचा प्रादुर्भाव वाढला आहे. कनारखेड परिसरात गहू, हरभरा, शाळू, ज्वारी, बाजरी, मका, भाजीपाला पिकांची लागवड करण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासन अचानक वातावरणात बदल होऊन धुके पडल्याने हरभरा पिकावर अळी तसेच मर रोगाचा प्रदुर्भाव वाढला आहे. कीड रोगाचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी संकटात सापडले आहेत. रब्बी पिकाचा बचाव कसा करावा, याची चिंता शेतकऱ्यांना लागली आहे. शेगाव तालुक्यातील चिंचोली, सवर्णा, लासुरा, शिरजगाव निले तिंत्रत गव्हाण वरुड कनारखेड, गायगाव, जवळा, वरखेड यासह इतर गावांतील शेतकऱ्यांना मार्गदर्शनाची गरज आहे. खरीप हंगामात परतीच्या पावसाने उडीद, सोयाबीन, मका, कापूस तसेच मिरची या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. दुसरीकडे हमीभाव मिळत नसल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# गो. से. महाविद्यालय खामगाव एन.सी.सी. कॅडेट्सची भारतीय सैन्य व अर्धसैन्य सुरक्षा दलामध्ये निवड

जनसंचलन/ खामगाव

विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित गो. से. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय खामगावच्या सहा एन.सी.सी. कॅडेट्सची सी.आर. पी.एफ. (केंद्रीय राखीव पोलिस दल) आणि सी.आय.एस.एफ. (केंद्रीय उद्योग सुरक्षा दल) मध्ये निवड झाली आहे. या कॅडेट्सची निवड महाविद्यालयच्या एन.सी.सी. विभागासाठी मोठा मान आहे आणि संपूर्ण महाविद्यालयमध्ये आनंदाचे वातावरण आहे. निवड झालेल्या कॅडेट्समध्ये कॅडेट. विशाल संतोष काळंगे, कॅडेट. नकुल अतुल चितोडे, कॅडेट प्रतिक संदिप डागर, कॅडेट. ऋषिकेश नरेंद्र सपकाळ, कॅडेट. विवेक सुशील सपकाळ आणि कॅडेट. सुमेध रामधन सरदार यांचा समावेश आहे. या कॅडेट्सने त्यांचे कठोर प्रशिक्षण, शिस्त आणि समर्पण यामुळे राष्ट्रीय स्तरावर आपले स्थान निश्चित केले आहे. कॅडेट यांनी सांगितले कि एन.सी.सी.मध्ये मिळालेल्या प्रशिक्षणामुळे आम्हाला आत्मविश्वास मिळाला आणि आपले लक्ष्य साध्य करणे शक्य झाले. विदर्भ शिक्षण प्रसारक मंडळ चे अध्यक्ष डॉ. सुभाषजी बोबडे आणि उपाध्यक्ष श्री अशोकजी झुनझुनवाला आणि सचिव डॉ. प्रशांतजी बोबडे यांनी कॅडेट्सच्या यशाबद्दल अभिनंदन केले आणि त्यांच्या उज्वल भविष्याची शुभेच्छा दिली. डॉ. सुभाषजी बोबडे यांनी सांगितले,हे यश महाविद्यालयच्या एन.सी. सी. विभागाच्या उत्कृष्ट कार्याचे प्रतिक आहे. या कॅडेट्सने आपल्या


SUO. प्रतिक संदिप डागर


कॅडेट. ऋषिकेश नरेंद्र सपकाळ


कॅडेट. विवेक सशील सपकाळ


कॅडेट. समेध रामधन सरदार


कॅडेट. विशाल संतोष काळंगे


कॅडेट. नकुल अतुल चितोडे

महाविद्यालयाचे नाव उज्वल केले आहे आणि आम्हाला गर्व आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर यांनी सांगितले की, महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट यांना वेळोवेळी स्पर्धा परीक्षा व सैन्य भरती करता मार्गदर्शन केले जाते. कॅडेट महाविद्यालयाच्या एन.सी. सी. विभागासाठी मोठे मान आहेत. या निवडीमुळे याच्या एन.सी.सी. विभागाला राष्ट्रीय स्तरावर आणखी प्रसिद्धी मिळेल. १३ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी खामगाव चे कमांडिंग ऑफिसर कर्नल. ओमेश शुक्ला यांनी कॅडेट यांचे अभिनंदन केले व सांगितले निवड झालेल्या कॅडेट्सने आपल्या मेहनतीचा आणि एन.सी.सी.च्या प्रशिक्षणाचा परिणाम म्हणून या महत्त्वपूर्ण टप्प्यावर पोहोचल्याचे सांगितले. याशिवाय, कॅडेट्सने भविष्यातही देशसेवेच्या क्षेत्रात योगदान देण्याची तयारी दर्शवली. एन.सी.सी. अधिकारी लेफ्टिनेंट. सुहास म. पिढेकर यांनी या यशाबद्दल कॅडेट्सचे कौतुक केले आणि त्यांचे मार्गदर्शन केले. ही निवड त्यांच्या कठोर परिश्रम, एकाग्रता आणि जिद्द याचे फलित आहे. हे सर्व एन.सी.सी. कॅडेट्ससाठी एक आदर्श ठरतील. तसेच डॉ. रोहिणी धरमकार यांनी सुद्धा कॅडेट याचे अभिनंदन केले व बटालियन स्टाफ सुभेदार मेजर दिनेश कुमार, सुभेदार सचिन बोदे, सुभेदार राठोड,सर्व स्टाफ व महाविद्यालय प्रशासन आणि एन.सी.सी. विभागाने कॅडेट्सच्या यशामुळे प्रगतीला चालना दिली आहे, तसेच विद्यार्थी वर्गाला प्रेरणा दिली आहे. महाविद्यालय प्रशासन आणि एन.सी.सी. अधिकारी यांचे मान्यतेच्या शब्दांत आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे या निवडीबद्दल धन्यवाद दिले. या निवडीमुळे कॉलेज आणि एन.सी.सी. कॅडेट्समध्ये गर्वाची भावना आहे आणि यापुढेही असेच यश मिळवण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेतले पाहिजे, असेही सांगितले. अशी माहिती एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. मोहम्मद रागिब देशमुख यांनी दिली आहे.

# प्रा. देवबा पाटील यांच्या मनोरंजनातून विज्ञान बालकथा संग्रहास राज्यस्तरीय पुरस्कार...

जनसंचलन/खामगाव

येथील गो. से.महाविद्यालयातील सेवानिवृत्त प्राध्यापक देवबा शिवाजी पाटील यांच्या मनोरंजनातून विज्ञान ह्या विज्ञानाधारित बालकथासंग्रहास मॉ जिजाऊ सार्वजनिक वाचनालय व वऱ्हाड विकास बहुउद्देशिय संस्था अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा ह्या वर्षीचा उत्कृष्ट बालवाङ्मयाचा राज्यस्तरीय जिजाऊ वाङ्मय पुरस्कार हा संपूर्ण महाराष्ट्रात साहित्य क्षेत्रात सन्मानाचा व प्रतिष्ठेचा समजला जाणारा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

हा विज्ञान बालकथासंग्रह रजत प्रकाशन, छ.संभाजीनगर यांनी प्रकाशित केला आहे. प्रा. देवबा पाटलांचे आतापर्यंत बालसाहित्याचे ३२ व इतर बहुविध प्रकारच्या साहित्याचे २९ अशी एकूण ६१ पुस्तके प्रकाशित झालेले आहेत. त्यांच्या अनेक पुस्तकांना विविध वाङ्मयीन पुरस्कार मिळालेले आहेत तसेच त्यांच्या वाङ्मयातील विशेष योगदानाबद्दलसुद्धा त्यांना बहुविध सन्मानांनी गौरविण्यात आलेले आहे. आतापर्यंत त्यांना एकूण ३१ पुरस्कार व मान सन्मान प्राप्त झालेले आहेत. विशेष म्हणजे म.रा. पाठ्यपुस्तक मंडळाने त्यांच्या गंमत जंमत बालकाव्यसंग्रहातील खार ही कविता अमराठी शाळांच्या वर्ग २ च्या मजेत शिकूया मराठी या पाठ्यपुस्तकात समाविष्ट केलेली आहे. तसेच भारत सरकारच्या सर्वोच्च अशा साहित्य अकादमीच्या मराठी भाषेच्या बालसाहित्य पुरस्कार सल्लागार समितीवर सुद्धा त्यांनी कार्य केलेले आहे. ह्या वाङ्मय पुरस्कार वितरणाचा समारंभ राष्ट्रमाता जिजाऊ जयंती निमित्त राजमाता जिजाऊ जन्मोत्सव सोहळ्यात दि.१२ जानेवारी २०२५ रोजी सत्कार समारंभात मान्यवरांचे हस्ते अकोला येथे राजमाता जिजाऊ वाचनालयामध्ये संपन्न झाला. ह्या पुरस्काराचे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्रासह वितरण मा. जी जी वाहूर वाघ साहेब, अध्यक्ष, अकोला जिल्हा महसूल कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्था अकोला यांच्या अध्यक्षतेखाली, मा. पंजाबराव वर, अध्यक्ष, मां जिजाऊ वाचनालय अकोला यांच्या शुभहस्ते आणि सुप्रसिद्ध साहित्यिक मा. पुष्पराज गावंडे, अकोला व मा. संजय देशमुख, अध्यक्ष, लोकस्वातंत्र्य पत्रकार महासंघ अकोला यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये सुपरीचित व सुप्रसिद्ध असलेला हा बहुमानाचा राज्यस्तरीय पुरस्कार देवबा पाटलांच्या पुस्तकाला प्राप्त झाल्याबद्दल नि त्यांना मिळालेल्या ह्या सन्मानाबद्दल गो. से.महाविद्यालयाचे अध्यक्ष मा. दादासाहेब उर्फ डॉ. श्री. सुभाष बोबडे, उपाध्यक्ष मा. श्री. अशोकसेठ झुनझुनवाला, सचिव मा. श्री. प्रशांत बोबडे, मा. प्राचार्य डॉ. धनंजय तळवणकर, मा. उपप्राचार्य डॉ. प्रफुल्ल उबाळे, कॉलेजचा सर्व प्राध्यापकवृंद, कर्मचारी आणि खामगावच्या अनेक सुप्रसिद्ध साहित्यिकांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल समाजाच्या सर्व स्तरांतून त्यांचे साभिनंदन कौतुक होत आहे.







# केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी निर्देशीत केल्याप्रमाणे आयुष मंत्रालयाच्या होमीओपॅथी आयुर्वेद, युनानी च्या पथकाने केस गळती रुग्णांशी साधला संवाद

## ICMR च्या शास्त्रज्ञांचा चमुही आज शेगांव येथे होणार दाखल...

**जनसंचलन/शेगाव**

केस गळती व टक्कल आजारावर संशोधन करण्याच्या दृष्टीकोनातुन केंद्रीय आयुष मंत्रालयाचे पथक जिल्हयात दाखल झाले असुन त्यांनी टक्कल ग्रस्त गावातील रुगणांशी हितगुच करुन माहिति संकलीत करण्याचे काम करत आहे. तर भारतीय वैद्यकिय संशोधन परिषद अर्थात च्या शास्त्रज्ञांचे दिल्ली आणि चेन्नई चे पथक आज दाखल होणार आहे.
बुलढाणा जिल्हयातील शेगांव तालुका अंतर्गत येणाऱ्या पहुरजिरा, कालवड, कठोरा, भोनगांव, बोंडगांव यांसह ११ गांवामध्ये नागरीकांचे केस गळती होऊन टक्कल पडत असल्याची समस्या निर्माण झाली होती. या गावांना ११ जानेवारी रोजी केंद्रीय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी भेट देऊन बाधीत रुग्णांना धिर देत या विचीत्र आजाराच्या संशोधनासाठी आयुष आणि भारतीय वैद्यकिय संशोधन परिषदेची टिमला आदेशीत केले होते. १३ जानेवारीला आयुष मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या प्रादेशिक होमीओपॅथी संशोधन संस्था नवि दिल्ली आणि केंद्रिय होमीओ परिषदेची शास्त्रज्ञाची टिम शेगांव तालुक्यात दाखल झाली आहे. यामध्ये युनानी होमीओपॅथी आणि आयुर्वेदीकचे तज्ञांचा समावेश असुन डॉ.हिंकल कौर, डॉ.प्रियंका सुर्यवंशी, डॉ.तेजस्वीनी पाटोळे यांच्या मार्गदर्शनाखाली केस गळती गावातील रुग्णांशी चर्चा करुन माहिती संकलीत करीता आहे. दरम्यान राज्याचे आरोग्य उपसंचालक डॉ.भंडारी, सहाय्यक संचालक डॉ.आर.पी.पुलवार यांनी केस गळती गावांना भेटी देऊन रुग्णांशी संवाद साधला. या आजाराविषयी घाबरुन न जाता आरोग्य विभागाच्या पथकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.
भारतीय वैद्यकिय संशोधन परिषद अर्थात दिल्ली आणि चेन्नई चे पथक आज १४ जानेवारी रोजी जिल्हयातील शेगांव येथे दाखल होणार आहे. या पथकामधील तज्ञ संशोधलक केस गळती भागातील बाधीत रुग्णांशी संवाद साधुन हा प्रकार कशामुळे झाला. त्याच मुळ शोधुन प्रादुर्भाव रोखण्याचे दृष्टीने काम करणार आहे. या विशेष पथकामध्ये डॉ.मनोज मुऱ्हेकर (-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ एपिडेमियोलॉजी, चेन्नई) , डॉ. सोमेश गुप्ता



(एम्स, नवी दिल्ली), डॉ सुमित अग्रवाल (, नवी दिल्ली), डॉ. शीला गोडबोले (-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी, पुणे) ,डॉ राज तिवारी (-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च इन एन्व्हायर्नमेंटल हेल्थ, भोपाळ) , डॉ सुचित कांबळे (-नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ ट्रान्सलेशनल व्हायरोलॉजी, पुणे) यांचा या विशेष पथकामध्य यांचा समावेश आहे.

---

# अखेर उपजिल्हा रुग्णालयातील शवगृह (पी.एम) फ्रिझरची ॲड रावळ यांनी स्वखर्चाने केली दुरुस्ती




**जनसंचलन/ मलकापूर**

उपजिल्हा रुग्णालयातील शवगृहातील (पी.एम हाऊस) मधील फ्रिझर गेल्या महिनाभरापासुन नादुरुस्त असुन ते तात्काळ दुरुस्त करा अन्यथा फ्रीझरची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढण्याचा इशारा शिवसेना (उ.बा. ठा)शहरप्रमुख गजानन ठोसर यांनी दिला होता. तर लोकनेते ॲड हरीश रावळ यांनी रुग्णालय अधिक्षक राजेंद्र उंबरकर यांची फ्रिझर दुरुस्तीबाबत कान उघाडणी केली होती मात्र उंबरकर यांनी कागदी घोडे नाचवत वंरीष्ठांशी पत्रव्यवहार केला असुन सदर फ्रिझर दुरुस्ती साठी कंपनी चा कर्मचारी येणार असून त्यासाठी एक लाख रुपये खर्च येईल असे सांगितले.

मलकापूर शहर हे नॅशनल हायवे क्रमांक ५३ व रेल्वे मार्गावर असल्याने अनेकदा अपघात घडून मृतकाची ओळख ही पटणे शक्य नसल्याने सदर मृतदेह फ्रिझरमध्ये दोन -दोन तीन -तीन दिवस ठेवावे लागत असल्याने व शवगृहातील फ्रिझर बंद असल्याने शवपेटी बाहेरून आणून पी.एम हाऊस मध्ये ठेवण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते मात्र लाखो रुपये दुरुस्तीसाठी लागत असल्याचा बहाणा करून शासनाकडून पैसे उकळण्याचा रुग्णालय अधीक्षकाचा एक प्रकारे गोरख धंदाच झाला की काय अशी चर्चा आता शहरात रंगू लागली आहे ... फ्रिझर दुरुस्तीसाठी लोकनेते ॲड हरीश रावळ व शिव-सेना शहरप्रमुख गजानन ठोसर यांनी शहरातील खाजगी व्यक्ती आणून अवघ्या साडेतीन हजार रुपयांत फ्रिझर सुव्यवस्थित केला यावेळी लोकनेते ॲड हरीश रावळ, शिवसेना(उ.बा. ठा) शहरप्रमुख गजानन ठोसर, नगर-सेवक अनिल गांधी, युवा नेते आदित्य रावळ सह आदिंची उपस्थिती होती.

# दुचाकी अपघातात दोन ठार, दोन जखमी

**जनसंचलन/मलकापूर**

भरधाव दुचाकींची समोरासमोर धडक होऊन घडलेल्या अपघातात दोन जण ठार तर दोन जण गंभीर जखमी झाले. येथून नजीकच्या पिंपळगाव देवी रस्त्यावर रविवारी सायंकाळी ही घटना घडली. जखमींना उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारासाठी अस्थिरोग तज्ज्ञ डॉक्टरच नाही. तर, दुसरीकडे खासगी डॉक्टर बाहेरगावी असल्याच्या कारणावरून शेकडो नागरिकांनी एकच गदार-ोळ माजविला. अखेर पोलिसांनी हस्तक्षेप करून जमाव पांगविला. मोताळा तालुक्यातील उन्हा येथील रहिवासी देविदास भिकाजी तायडे (४७) हे त्यांच्या दुचाकीवरून घरी परतीच्या वाटेवर निघाले होते. रविवारी सायंकाळी ६.३० च्या सुमारास मलकापूर-पिंपळगाव देवी रस्त्यावर विरुद्ध दिशेने भरधाव वेगाने आलेल्या दुचाकीची समोरासमोर धडक होऊन अपघात घडला. या घटनेत गंभीर जखमी अवस्-थेत चौघांना येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी देविदास भिकाजी तायडे यांच्या डोक्याला जबर दुखापत झाल्याने त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांना डॉक्टरांनी मृत घोषित केले. तर उर्वरित शेख साबीर (३६) व शहबाद अब्दुल रहिम (२७ दोघेही रा. पारपेठ मलकापूर) अशा दोघांनाही बुलढाणा येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे. या घटनेत गंभीर जखमी झालेल्या शेख रयीस शेख युनीस (२०) ह्याला प्राथमिक उपचार करून त्याची प्रकृती अत्यवस्थ झाल्याने येथीलच खाजगी रुग्णालयात हलविण्यात आले आहे. मात्र, प्रकृती आणखी खालावल्याने त्याला बुलढाणा येथे नेत असताना वाटेतच त्याचा मृत्यू झाला. गंभीर जखमी हे येथील पारपेठ भागातील बांधकाम मजूरीचे काम करतात. त्यांच्या अप-घाताची माहिती कळताच अनेक नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयात धाव घेतली. गंभीर जखमींवर उपचार करण्यासाठी उपजिल्हा रुग्णालयात अस्थिरोग तज्ञ डॉक्टरच नाही. दुसरीकडे बहुतांश खाज-गी डॉक्टर बाहेरगावी असल्याच्या कारणावरून शेकडो नागरिकांनी एकच गदारोळ माजवला. अशातच पोलिस निरीक्षक गणेश गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक घटनास्थळी दाखल झाले होते.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958